RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ११८ (१५)] बुधवार, सप्टेंबर २४, २०२५/आश्विन २, शके १९४७ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ सप्टेंबर २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आस्थाप्र-२०२१/प्र.क्र.८(भाग-ब)/आस्थापना-२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत काढलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याव्दारे, महाराष्ट्र शासनाच्या, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या आस्थापनेवरील सहसंचालक किंवा सदस्य सचिव, उपसंचालक किंवा प्रादेशिक उपसंचालक, सहाय्यक संचालक किंवा संशोधन अधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी गट-अ आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब **(राजपत्रित)** या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :-

१. या नियमांना, महाराष्ट्र शासनाच्या, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या आस्थापनेवरील "सहसंचालक किंवा सदस्य सचिव, उपसंचालक किंवा प्रादेशिक उपसंचालक, सहाय्यक संचालक किंवा संशोधन अधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी गट-अ आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब **(राजपत्रित)** या पदांचे सेवाप्रवेश नियम २०२४" असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, -

(क) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे ;

(ख) " संचालनालय " याचा अर्थ, इतर मागास बहुजन कल्याण विभाग या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील " इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे " असा आहे ;

(ग) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता ;

(घ) " पदोन्नतीची पात्रता " याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी काढलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता, असा आहे ;

(ड) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

३. " **सहसंचालक** किंवा **सदस्य सचिव (गट-अ)** " या पदावर नियुक्ती एकतर,-

(क) " उपसंचालक किंवा प्रादेशिक उपसंचालक गट-अ " हे संचालनालयाच्या आस्थापनेवरील पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षाहून कमी नसेल इतकी सलग नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्रता असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ख) जर पदोन्नतीच्या मार्गाने पात्र अधिकारी उपलब्ध होत नसेल तर, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या धोरणाच्या अटी व शर्तीनुसार योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात येईल :

परंतु, उक्त पदावर प्रतिनियुक्तीद्वारे करावयाची नियुक्ती ही, मंजूर पदांच्या पंधरा टक्क्यांहून अधिक असणार नाही.

४. " **उपसंचालक** किंवा **प्रादेशिक उपसंचालक (गट-अ)** " या पदावरील नियुक्ती एकतर, -

(क) "सहाय्यक संचालक किंवा संशोधन अधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी गट-अ" हे संचालनालयाच्या आस्थापनेवरील पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षाहून कमी नसेल इतकी सलग नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्रता असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल : किंवा

(ख) जर पदोन्नतीच्या मार्गाने पात्र अधिकारी उपलब्ध होत नसेल तर, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या धोरणाच्या अटी व शर्तीनुसार योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात येईल :

परंतु, उक्त पदावर प्रतिनियुक्तीद्वारे करावयाची नियुक्ती ही, मंजूर पदांच्या पंधरा टक्क्यांहून अधिक असणार नाही.

५. " **सहाय्यक संचालक** किंवा **संशोधन अधिकारी** किंवा **प्रकल्प अधिकारी (गट-अ)** " या पदावरील नियुक्ती एकतर, -

(क) "इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी (गट-ब) **(राजपत्रित)**" हे संचालनालयाच्या आस्थापनेवरील पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षाहून कमी नसेल इतकी सलग नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्रता असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ख) जे उमेदवार, पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :-

(एक) वयोमर्यादा.-

(एक) **किमान वयोमर्यादा**- सदर पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास पूर्ण झालेले वय अठरा वर्षापेक्षा कमी नसेल ;

(दोन) **कमाल वयोमर्यादा**- सदर पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी वय अडतीस वर्षापेक्षा अधिक नसेल व राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय त्रेचाळीस वर्षापेक्षा अधिक नसेल.

(दोन) **किमान शैक्षणिक अर्हता-** उमेदवार पदवी धारण करणारा असावा,

किंवा

(घ) जर पदोन्नतीच्या मार्गाने पात्र अधिकारी उपलब्ध होत नसेल तर, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या धोरणाच्या अटी व शर्तीनुसार योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात येईल :

परंतु, उक्त पदावर प्रतिनियुक्तीद्वारे करावयाची नियुक्ती ही, मंजूर पदांच्या पंधरा टक्क्यांहून अधिक असणार नाही.

६. **" इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी (गट-ब)"** या पदावरील नियुक्ती एकतर, -

(क) "वरिष्ठ निरिक्षक इतर मागास बहुजन कल्याण (गट-क) किंवा कार्यालयीन अधीक्षक (गट-क)" हे संचालनालयाच्या आस्थापनेवरील पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षाहून कमी नसेल इतकी सलग नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून एकत्रीत ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्रता असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ख) जे उमेदवार, पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :-

(एक) वयोमर्यादा.-

(एक) **किमान वयोमर्यादा-** सदर पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास पूर्ण झालेले वय अठरा वर्षांपेक्षा कमी नसेल ;

(दोन) **कमाल वयोमर्यादा-** सदर पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी वय अडतीस वर्षांपेक्षा अधिक नसेल व राखीव प्रवर्गांतील व्यक्तींसाठी वय त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नसेल.

(दोन) **किमान शैक्षणिक अर्हता-** उमेदवार पदवी धारण करणारा असावा,

किंवा

(घ) जर पदोन्नतीच्या मार्गाने पात्र अधिकारी उपलब्ध होत नसेल तर, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या धोरणाच्या अटी व शर्तीनुसार योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्यात येईल :

परंतु, उक्त पदावर प्रतिनियुक्तीद्वारे करावयाची नियुक्ती ही, मंजूर पदांच्या पंधरा टक्क्यांहून अधिक असणार नाही.

७. नियम ५ येथे नमूद केलेल्या पदावरील पदभरतीकरिता एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ५०: ५० असे राहील.

८. नियम ६ येथे नमूद केलेल्या पदाच्यावरील पदभरतीकरिता एकूण मंजूर पदसंख्येसाठी, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती देण्याचे प्रमाण हे अनुक्रमे ३०: ७० असे राहील.

९. नियम ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या उमेदवारास एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करावा लागेल आणि त्याची सेवाज्येष्ठता, विभागीय परीक्षा, परिवीक्षाधीन कालावधी व इतर संबंधीत बाबी यांचे, सामान्य प्रशासन विभागाने, याबाबतीत, वेळोवेळी काढलेल्या अधिसूचना, नियम, आदेश किंवा अन्य कोणतेही संलेख यानुसार विनियमन करण्यात येईल. उपरोक्त प्रमाणे नियुक्त होणारी व्यक्ती परिवीक्षाधीन कालावधीमध्ये शिफारस प्राप्त पदासाठी अयोग्य असल्याचे आढळले तर, ती सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

१०. (१) नियम ३, ४, ५ आणि ६ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करेल.

(२) नियम ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. ती व्यक्ती, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

११. (१) नियम ३, ४, ५ आणि ६ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार किंवा आदेशांनुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(२) नियम ५ आणि ६ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत शासनाने वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील. ती व्यक्ती, ते प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

१२. (१) नियम ५ किंवा ६ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी शिफारस केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार आणि याबाबत शासनाने वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकाला दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिध्द झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यासाठी अपात्र असेल.

१३. नियम ३, ४, ५ किंवा ६ येथे नमूद केलेल्या पदांची जेष्ठता राज्यस्तरावर ठेवली जाणार असल्याने सदर पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

१४. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीनंतर, शासनाने याबाबतीत, नियुक्तीपूर्वी किंवा नियुक्तीनंतर, वेळोवेळी केलेले कोणतेही नियम, आदेश किंवा निर्णय यामध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील अशा शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आप्पासो धुळाज,** (भा.प्र.से),
सचिव,
इतर मागास बहुजन कल्याण विभाग.

## OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated 24th September, 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Asthapra–2021/C.R.8(Part-B)/Asthapana-2.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, notifications, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the post of Joint Director or Member Secretary, Deputy Director or Regional Deputy Director, Assistant Director or Research Officer or Project Officer Group-A and Other Backward Bahujan Welfare Officer Group-B (*Gazetted*), on the establishment of Directorate, Other Backward Bahujan Welfare, Pune under the administrative control of the Other Backward Bahujan Welfare Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the, "Joint Director or Member Secretary, Deputy Director or Regional Deputy Director, Assistant Director or Research Officer or Project Officer, Group-A and Other Backward Bahujan Welfare Officer, Group-B (*Gazetted*), on the establishment of the Directorate, Other Backward Bahujan Welfare, Pune under the administrative control of the Other Backward Bahujan Welfare Department of the Government of Maharashtra, (Recruitment) Rules 2024".

2. In these rules, unless the context requires otherwise,-

(*a*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*b*) " Directorate" means the Directorate of Other Backward Bahujan Welfare, Pune, Government of Maharashtra under the administrative control of the Other Backward Bahujan Welfare Department ;

(*c*) " Degree " means degree of any discipline of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent ;

(*d*) " Eligibility for promotion " means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time.

(*e*) " Government " means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of **Joint Director** or **Member Secretary Group-A** shall be made either, —

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Deputy Director or Regional Deputy Director Group-A on the establishment of Directorate, having not less than three years regular and continuous service on that post ; or

(*b*) by deputation of a suitable person holding the equivalent post if the eligible candidate for promotion is not available. The appointment by deputation shall be made in accordance with the terms and conditions of the deputation policy prescribed by the General Administration Department, from time to time :

Provided that, the appointment by deputation to the said post shall not be more than fifteen per cent of the sanctioned posts.

4. Appointment to the post of **Deputy Director** or **Regional Deputy Director, Group-A** shall be made either, —

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Director or Research Officer or Project Officer, Group-A on the establishment of Directorate, having not less than three years regular and continuous service on said post ; or

(*b*) by deputation of a suitable person holding the equivalent post if the eligible candidate for promotion is not available. The appointment by deputation shall be made in accordance with the terms and conditions of the deputation policy prescribed by the General Administration Department, from time to time :

Provided that, the appointment by deputation to the said post shall not be more than fifteen per cent of the sanctioned posts.

5. Appointment to the post of **Assistant Director** or **Research Officer** or **Project Officer, Group-A** shall be as either, —

(*a*) by promotion of a suitable person, having eligibility for promotion on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Other Backward Bahujan Welfare Officer, Group-B (*Gazetted*) on the establishment of Directorate and having not less than three years regular and continuous service on that post ; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission, on the basis of result of the Competitive Examination conducted therefor, who fulfills criteria, namely:-

(*i*) Age limit. -

(A) *Lower Age Limit*– Not less than eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post ;

(B) *Upper Age Limit*– Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the post.

(*ii*) *Minimum Educational Qualification*.– Possess a degree ; or

(*c*) by deputation of a suitable person holding the equivalent post if the eligible candidate for promotion is not available. The appointment by deputation shall be made in accordance with the terms and conditions of the deputation policy prescribed by the General Administration Department, from time to time :

Provided that, the appointment by deputation to the said post shall not be more than fifteen per cent of the sanctioned posts.

6. Appointment to the post of **Other Backward Bahujan Welfare Officer, Group-B** shall be made either,–

(*a*) by promotion of a suitable person, having eligibility for promotion on the basis of combine seniority, from amongst the persons holding the post of Senior Inspector, Other Backward Bahujan Welfare, Group-C or Office Superintendent, Group-C on the establishment of Directorate, having not less than three years continuous regular service and possessing degree on the said post ; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission, on the basis of result of the Competitive Examination conducted therefor, who fulfills the following criteria, namely :–

(*i*) *Age limit*.–

*(A) Lower Age Limit*- Not less than eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post ;

*(B) Upper Age Limit*- Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the post.

(*ii*) *Minimum Educational Qualification*.– Possess a degree ; or

(*c*) by deputation of a suitable person holding the equivalent post if the eligible candidate for promotion is not available. The appointment by deputation shall be made in accordance with the terms and conditions of the deputation policy prescribed by the General Administration Department, from time to time :

Provided that, the appointment by deputation to the said post shall not be more than fifteen per cent of the sanctioned posts.

7. Appointment to the post mentioned in rule 5 shall be made by promotion and nomination in the ratio of 50:50, respectively, for the total number of sanctioned posts of a post to be filled under rules 5.

8. Appointment to the post mentioned in rule 6 shall be made by promotion and nomination in the ratio of 30:70, respectively, for the total number of sanctioned posts of a post to be filled under rules 6.

9. A person appointed to the posts mentioned in rule 5 and 6 by nomination shall complete Combined Probationary Training Programme (CPTP) and his Seniority, Departmental Examination, Probation Period and other related matters shall be regulated as per notifications, rules, orders or any other instruments issued in this behalf by the General Administration Department, from time to time. If the candidate is found unsuitable for the said posts, his services shall be liable to be terminated.

10. (*1*) A person to be appointed to the post mentioned in rule 3, 4, 5 and 6 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(*2*) A person appointed to the post mentioned in rule 5 and 6 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

11. (*1*) A person to be appointed to the post mentioned in rule 3, 4, 5 and 6 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

(*2*) A person appointed to the post mentioned in rule 5 and 6 by nomination shall possess a Certificate in Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate of Computer Operations otherwise shall not eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same.

12. (*1*) A person recommended for appointment by the nomination to the post mentioned in rule 5 and 6 shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in Government Service.

(*3*) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, than he shall be disqualified for continuing on the said post in Government service.

13. A person appointed to the post mentioned in rules 3, 4, 5 or 6 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra as the seniority of the said post is maintained at the State level.

14. The terms and conditions specified by the Government, in any rules, orders or resolutions issued in this behalf by the Government, from time to time before or subsequent to appointment of any Government servant, shall also be applicable to the Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

APPASO DHULAJ, (I.A.S.),
Secretary,
Other Backward Bahujan Welfare Department.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.